# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in
संकेत स्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

## जाहीर नोटीस

### महाराष्ट्रतील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पुर्ततेची पडताळणी करण्यासाठी आयोगाने सुरु केलेल्या कार्यवाहीसंबंधी जनतेकडून सूचना आणि हरकती मागविण्याबाबत

नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ), त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१० मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) राज्यातील वितरण परवानाधारकांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकाच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी वार्षिक तत्त्वावर करीत असतो. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ने सादर केलेल्या माहितीच्या आधारे, आयोगाने, खालील प्रकरणांमध्ये राज्यातील वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या लक्ष्यांकांच्या केलेल्या पूर्ततेची पडताळणी करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे व वितरण परवानाधारकांना त्यांच्या सन २०१५-१६ साठीच्या लक्ष्यांकांच्या पूर्ततेची तपशीलवार माहिती आयोगास देण्याचे निर्देश दिले आहेत.

| अनु. क्र. | वितरण परवानाधारक | प्रकरण क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड | सन २०१६ चे प्र.क्र. १६९ |
| २ | बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम | सन २०१६ चे प्र.क्र. १७० |
| ३ | टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (वितरण) | सन २०१६ चे प्र.क्र. १७१ |
| ४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (वितरण) | सन २०१६ चे प्र.क्र. १७२ |
| ५ | इंडियन रेल्वे | सन २०१६ चे प्र.क्र. १७३ |
| ६ | माईंडस्पेस बिझनेस पार्क प्रा.लि. | सन २०१६ चे प्र.क्र. १७४ |

त्यानुसार, वितरण परवानाधारकांनी सविस्तर माहिती आयोगास सादर केली असून या माहितीची एक प्रत, 'महाऊर्जा'ने सादर केलेल्या माहितीसह, आयोगाच्या www.merc.gov.in / www.mercindia.org.in या संकेत-स्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

वितरण परवानाधारकांनी व महाऊर्जाने सादर केलेल्या माहितीवर, आयोग जनतेकडून अभिप्राय, सूचना आणि हरकती लेखी मागवित असून त्या सहा (१ + ५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यपार केंद्र, कफ परेड, मुंबई–४०० ००५, [फॅक्स: ०२२-२२१६३९७६ ई-मेल: mercindia@merc.gov.in] या पत्त्यावर **गुरुवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०१७** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

सदर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठविणाऱ्याने त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि,

असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे त्यात नमूद करण्यात यावे. तसेच सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर ते देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून, **गुरुवार, दि. २ फेब्रुवारी, २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई, ४०० ००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणींच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**गुरुवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०१७** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

ठिकाण : मुंबई,
दिनांक : **६ जानेवारी, २०१७**

**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**